# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना**

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३०७ दिनांक : १०/०४/२०२४

प्रति,
डॉ. शरद गायकवाड
कोल्हापूर

विषय : व्याख्याते म्हणून निमंत्रण...

मा. महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दिनांक ११ ते १४ एप्रिल, २०२४ या कालावधीत महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी आपले व्याख्यान आयोजित करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. आपण या पत्राद्वारे केलेल्या आमंत्रणाचा स्विकार करून गुरूवार दिनांक ११ एप्रिल, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत 'शिव–फुले–शाहू–आंबेडकर यांचा समतेचा संदेश' या विषयावर उपस्थितांना संबोधित करावे.

सदर व्याख्यानासाठी प्रवास खर्च व मानधन आपणांस विद्यापीठाच्या नियमानुसार देण्यात येईल.

कळावे हि विनंती.

डॉ. सदानंद भोसले
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कोल्हापूर

कोल्हापूर दु.क्र. ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswokolhapur-@ gmail.com

जा.क्र/सआसकको/शाहूजयंती/कार्यक्रम/२०२४-२५/ २७०६ /कोल्हापूर दिनांक २५/०६/२०२४

प्रति,
मा. प्रा. डॉ. शरद गायकवाड,
कोल्हापूर

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती साजरी करणेबाबत... दि. २७/६/२०२४ रोजी आयोजीत जाहीर परिसंवाद कार्यक्रमास व्याख्याते म्हणून उपस्थित राहणेबाबत...

संदर्भ :- १. मा. पालकमंत्री, जिल्हाकोल्हापूर यांच्या उपस्थितीत दि. १५/०६/२०२४ रोजी संपन्न झालेली बैठक.
२.राजर्षी शाहू महाराज शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सव समितीचीदि.१८/०६/२०२४ व दि. १९/०६/२०२४ रोजी संपन्न झालेली बैठक.

महोदय,

विषयांकित बाबत आपणांस कळविण्यात येते की, भारताच्या इतिहासातील अद्वितीय व्यक्तीमत्व व कोल्हापूरचा मानबिंदू असलेले आदर्श राजे, पुरोगामी विचारांचे महान समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या दि. २६/०६/२०२४ पासून होणाऱ्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात सर्व पातळीवर मोठ्या उत्साहात व भव्य स्वरुपात करणेबाबत शासनाकडून तसेच मा. पालकमंत्री, महोदय यांचेकडून सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार संदर्भान्वये राजर्षी शाहू महाराज शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सव समितीची दि.१८/०६/२०२४ व दि. १९/०६/२०२४ रोजी बैठक संपन्न झालेली असून सदर बैठकीमध्ये दि. २५/०६/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने दि. २७/०६/२०२४ रोजी माणगांव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथील स्मारकास अभिवादन करून ए.पी.मगदुम हायस्कूलमध्ये सकाळी १०.३० वा. जाहीर परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरच्या कार्यक्रमास मा. लोकप्रतिनिधी महोदय, तसेच इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी जाहीर परिसंवाद कार्यक्रमामध्ये **समाज अभियांत्रिकी आणि राजर्षी शाहू** या विषयावर आपले मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजीत केले असून सदर कार्यक्रमास विहीत वेळेत उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती

(सचिन साळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, कोल्हापूर

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर -</u>**
१) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर
२) मा. उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

Scanned with Oken Scanner

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय - २८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti

जा.क्र.बार्टी /संशोधन विभाग/अण्णाभाऊ साठे/२०२४-२५/ दि. ५/७/२०२४

प्रति,

प्रा. डॉ. शरद गायकवाड,
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर, यांना.

**विषय:- "साहित्यरत्न, लोकशाहीर-अण्णा भाऊ साठे ऐतिहासिक संदर्भ - चरित्र" या प्रकल्पाविषयी संशोधन,लेखन करणेकरीता आयोजित तिस-या बैठकीस उपस्थित राहणेबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणारी बार्टी ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. महाराष्ट्रातील उपेक्षित, वंचित असणाऱ्या ५९ जातींचा अभ्यास या बार्टी संस्थेकडून होत असतो.

या प्रयत्नाचा एक भाग म्हणून **"साहित्यरत्न, लोकशाहीर-अण्णा भाऊ साठे ऐतिहासिक संदर्भ - चरित्र"** या प्रकल्पाअंतर्गत येणारा भाग म्हणजेच अण्णा भाऊ यांनी त्यांच्या कथा-कादंब-यांना लिहिलेल्या प्रस्तावना हा होय. त्या सा-या प्रस्तावनांना एकत्र करुन त्यांचे दस्तावेजीकरण करण्यासाठी व ते ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यासाठी दोन दिवसीय तिस-या बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने **"साहित्यरत्न, लोकशाहीर-अण्णा भाऊ साठे ऐतिहासिक संदर्भ - चरित्र** या प्रकल्पाविषयी संशोधन, लेखन करणेकरीता, दि. ०८/०७/२०२४ ते ०९/०७/२०२४ रोजी ठिक १२.०० वाजता बार्टी मुख्यालयात उपस्थित राहवे. ही विनंती.

**डॉ.प्रेम हनवते**
**प्रकल्प व्यवस्थापक**
**संशोधन विभाग,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे.**

**प्रत :- माहितीस्तव.**

१) मा.महासंचालक बार्टी, पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
२) मा.निबंधक बार्टी, पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
३) प्राचार्य - महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

2:50 57%



स्थापना : २००६ ॥ श्री सद्गुरू जंगली महाराज प्रसन्न ॥ नोंदणी क्रमांक : १९४३

# श्री सद्गुरू गरीबदास बाबा आराधना धाम ट्रस्ट

आंबप फाटा वाठार तर्फ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

संदर्भ क्रमांक : दिनांक : / / २००

प्रति,

डॉ.शरद गायकवाड

( आण्णा भाऊ साठे गौरव राष्ट्रीय पुरस्कार)

सप्रेम नमस्कार.........!

आपणाला कळवण्यास आनंद होत आहे की, आमच्या श्री सदगुरु जंगली महाराज आश्रम, श्री सदगुरु गरीबदास बाबा आराधना धाम ट्रस्ट वठार तर्फ वडगाव या संस्थेच्या वतीने दिला जाणारा मानाचा पहिलाच पुरस्कार आपणास सन्मानाने देत आहोत तरी आपण या पुरस्कारचा स्विकार करून या समारंभास सहकुटुंब उपस्थितीत राहून आमचा आनंद द्विगुणीत करावा ही नम्र विनंती.

कळावे आपले,

अध्यक्ष सचिव

श्री. सदगुरु गरीबदास बाबा आराधना धाम
मु.पो. वठार तर्फे वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.




डॉ. शरद गायकवाड
आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व अभ्यासक


वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा सुरेख संगम मा. ता. मोरे यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील इथल्या समाजाचे प्रबोधन करणारे ते खऱ्या अर्थाने बहुजनांचे प्रबोधनकार आहेत. बहुजन समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती यांना हद्दपार करून बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर या महानायकांच्या विचारांची रुजवणूक मोरे यांनी आयुष्यभर केलेली आहे. बहुजन समाजाचे अस्तित्व आणि अस्मिता उजागर करण्याचे मोलाचे ऐतिहासिक कार्य त्यांनी अत्यंत जिद्दीने, कष्टाने व प्रचंड निष्ठेने शेवटच्या श्वासापर्यंत केले आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील या महामानवांच्या बरोबरच आमदार बी. सी. कांबळे, दादासाहेब गायकवाड, डी. वाय. पाटील, बॅरिस्टर शंकरराव डीगे, दादासाहेब शिर्के या सामाजिक नाळ जपणाऱ्या राजकारण्यांशी त्यांचा स्नेह होता. वि. स. खांडेकर, रणजित देसाई, शंकरराव खरात, भाई माधवराव बागल या महनीय व्यक्तींशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे ऋणानुबंध होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पहिला पुतळा बाबासाहेबांच्या हयातीतच कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदू चौकात सन १९५० मध्ये सत्यशोधक भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली उभारला गेला, त्याप्रसंगी मा. ता. मोरे यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. गावकुसाबाहेरच्या मातंग कुटुंबात जन्मलेले मा. ता. मोरे स्वच्छता, नीटनेटकेपणा, भाषेवर प्रभुत्व आणि दैनंदिन व्यवहारात फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांच्या विचारांवर चालत. त्यामुळे ते पश्चिम महाराष्ट्रातील बहुजनांचे प्रबोधनकार म्हणून प्रसिद्ध होते. या ग्रंथाच्या माध्यमातून मा. ता. मोरे यांचे उपेक्षित राहिलेले जीवन आणि कार्य पुढे आल्याने सामाजिक चळवळींना निश्चितच ते दिशादर्शक ठरणार आहे.

डॉ. शरद गायकवाड

प्रा. डॉ. शरद गायकवाड यांची इतर पुस्तके







सामाजिक | १६० ₹
Desing By Ganesh Poladar
नाग-नालंदा प्रकाशन


बहुजनांचा प्रबोधनकार : मा.ता.मोरे
डॉ. शरद गायकवाड
नाग-नालंदा प्रकाशन

# बहुजनांचा प्रबोधनकार
# मा.ता.मोरे

संपादक : डॉ. शरद गायकवाड







# वार्ता सम्राट

संपादक : प्रकाश कांबळे (लिंगनूरकर)

Postal Reg.No.KLP-346/2023-2025 RNI No.MAHMAR/2016/72710 email :vartasamrat@gmail.com

* वर्ष ८ वे * अंक १७ वा *शनिवार दि.९ मार्च २०२४ * पृष्ठ ४ * किंमत ५ रूपये*


# डॉ.शरद गायकवाड यांना राज्य शासनाचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर

कोल्हापूर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकर विचार प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक, ज्येष्ठ साहित्यिक, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते तसेच फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची पताका राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर सन्मानाने फडकविणारे विचारवंत, समीक्षक डॉ. शरद गायकवाड (कोल्हापूर) यांना महाराष्ट्र शासनाचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर झाला आहे.

महावीर महाविद्यालयाच्या मराठी विभागातील डॉ.शरद गायकवाड हे साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत. डॉ. शरद गायकवाड यांनी मातंग समाजावर पीएच. डी. केलेली असून अण्णाभाऊ साठे यांचे कनिष्ठ बंधू शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास या विषयावर



डॉ.शरद गायकवाड

१९९७ मध्ये शिवाजी विद्यापीठात एम.फील. केलेली आहे.

मातंग समाज साहित्य आणि संस्कृती,मातंगांची शौर्यगाथा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि अण्णाभाऊ साठे, बहुजनवादी साहित्य, क्रांतीचं कुळ आणि बंडाचं मूळ,अॅट्रॉसिटी अॅक्ट या सारख्या १३ वैचारिक ग्रंथांचे लेखन डॉ. शरद गायकवाड यांनी केलेले आहे.

गेली तीस वर्षे डॉ. शरद गायकवाड हे मराठवाडा, विदर्भ, खानदेश, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, गोवा येथे जाऊन फुले-शाहू-आंबेडकर, लहुजी, अण्णाभाऊ साठे या महापुरुषांच्या विचारांचा प्रसार-प्रचार करीत आहेत.

रशिया, थायलंड, मलेशिया देशात जाऊन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रां मधून परिवर्तनवादी, प्रबोधनवादी विचारांचे शोधनिबंध सादर करून आंतरराष्ट्रीय पातळीवर व्याख्याने देत आहेत. धर्मनिरपेक्षता, समाजवाद, संविधान साक्षरते बरोबरच अंधःश्रद्धा निर्मूलन, जाती तोडा-समाज जोडा अभियान ते राबवित आहेत.

डॉ. शरद गायकवाड यांच्या सामाजिक, साहित्यिक कार्याबद्दल महाराष्ट्रात अनेकविध संघटनांकडून त्यांना आजपर्यंत सत्तावीस पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.मॉरिशसच्या आंतरराष्ट्रीय कार्यगौरव पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते.

प्रा.डॉ.शरद गायकवाड यांच्या एकूणच राष्ट्रीय आतंरराष्ट्रीय वरील कार्याची नोद घेवून सामाजिक न्याय विभागाच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने त्यांना २०२२-२३ सालचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार घोषीत करण्यात आला आहे.

या पुरस्काराचे वितरण मुख्यमंत्री नाम.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १२ मार्च रोजी मुंबई येथे होत आहे.

डॉ.शरद गायकवाड यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

********